# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई Police Station, पहिली खबर क्र. ११ FIR No., वर्ष 2023 Year, दिनांक 20/04/2023 Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून ........, वेळ ........, तारीख पर्यंत ........, वेळ ........
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date ११/०४/२०२३, वेळ Time १२:४५ वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ४६/२३, तारीख Date 20/04/2023, वेळ Time 23:45 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा दिड कि.मी. पश्चिमेस, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. वरळी, मुंबई
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव आरे दुग्धशाळा, वरळी मुंबई, क्रमांक असल्यास No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road खान अब्दुल गफार खान रोड
   Address of Occurrence Name
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place वरळी सी फेस, वरळी Village, मुंबई Post, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्रीनिवास सायन्ना जुटला (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name सायन्ना जुटला
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ६३ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 8454010434
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........, (f) व्यवसाय Occupation सेवानिवृत्त
   (g) धर्म Religion हिंदु, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address प्रेमनगर झोपडपट्टी Ward, घर / रूम नंबर House/Name No. ४५२, फोन /मो. नंबर Phone/M. No. ........, पॅन नं. Pan No. ........, वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road बी.जी. खेर मार्ग, जवळचे ओळख ठिकाण Nearest identifiable place वरळी नाका, वरळी Village, मुंबई, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   रणजितसिंग कोमलसिंग राजपूत, वय ५६ वर्षे. रा.ठी. डी/५, वरळी डेअरी स्टाफ क्वार्टर्स वरळी, मुंबई

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी यांचा जबाब स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केला असून तोच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(गणेश पिंगुवाले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

Sutte 20/04/23

Scanned with OKEN Scanner

(३)

फिर्याद दिनांक – २०/०४/२०२३.

मी श्रीनिवास सायन्ना जुटला, वय ६३ वर्षे, धदां–सेवानिवृत्त, राठी– प्रेमनगर झोपडपट्टी रूम नं. ५९२ शिवसेना शाखेच्या मागे, बी जी खेर रोड, वरळी नाका, वरळी मुंबई–४०००१८ मो क्र ८४५४०१०४३४,

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियासमवेत गेल्या ६३ वर्षापासुन रहात आहे. मी सन–१९८२ मध्ये महराष्ट्र शासन वरळी, दुग्धशाळा, मुंबई येथे रोजंदार म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात नोकरीस लागलो. सन–१९९१ मध्ये मी पहारेकरी म्हणुन कायम कर्मचारी झालो. मी नोकरीस लागल्यापासुन महराष्ट्र शासन दुग्धशाळा, मुंबई अंतर्गत आरे, वरळी व कुर्ला दुगधशाळा येथे वेळोवेळी कर्तव्य केलेले आहे.

मी, दि. ३० सप्टेंबर २०२० रोजी नियत वयोमानानुसार वयाच्या ६० व्या वर्षी महराष्ट्र शासन दुग्धशाळा अतर्गत गोरेगांव गुरांचा बाजार या खात्यामधुन पहारेकरी या पदावरुन सेवानिवृत्त झालो आहे. मला सेवानिवृत्तीनंतर जी.पी.एफ. ग्रॅच्युईटी, आणि इतर लाभ रक्कम मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रांवर व फॉर्म सी भरुन आमचे कार्यालयाकडुन महालेखापाल कार्यालय(ए.जी.ऑफिसला) पाठवावयाचे होते त्याकरीता मी कार्यालयातील नियंत्रक श्री. राजपुत साहेब यांना भेटलो असता त्यांनी सदर माहालेखापाल कार्यालयात पाठविण्यात येणा–या कागदपत्रांवर सही करण्याचा मोबदला म्हणून माझयाकडे रु. २५०००/– ची मागणी केली होती. त्यानंतर मी वेळोवेळी कार्यालयात कागदपत्रांवर सहया करण्यासाठी श्री. राजपुत साहेबांकडे जात होतो, परंतु त्यानी मला गेले दोन वर्षे रखडवले.

दि. १०/०४/२०२३ रोजी मी गोरेगांव गुरांचा बाजार कार्यालयात माझ्या कागदपत्रांवर सहया झाल्या किंवा कसे? पाहाण्यासाठी कार्यालयात गेलो असता मला राजपुत साहेबांनी सांगितले की, “मी तुमच्या कागदपत्रांवर आज सहया करतोय, व पुढील कार्यवाहीसाठी लेखा कार्यालय येथे कागदपत्रे पाठवुन देत आहे, तसेच त्यांनी सही करण्याचा मोबादला म्हणुन मला रु. १०,०००/– आणुन दे असे सांगितले.” त्यावर मी ठिक आहे असे सांगुन त्यांचे कार्यालयातुन निघुन गेलो.

दि. १०/०४/२०२३ रोजी श्री. राजपुत साहेबांनी सही करण्याचा मोबदला म्हणुन माझेकडे मागितलेले रु. १०,०००/– मला त्यांना दयायची इच्छा नव्हती म्हणुन मी दि. १९/०४/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे येवून लोकसेवक श्री. राजपुत साहेब यांचेविरुध्द पोलीस निरीक्षक पिंगुवाले यांचेकडे लेखी तक्रार दिली.

त्यानंतर पो.नि. पिंगुवाले हे पहील्या माळयावरील रुम क्र. ११५ मध्ये घेवून गेले तेथे एक महीला अधिकारी बसल्या होत्या, त्यांची ओळख मला सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती अडसुरे अशी करुन देवून ते पडताळणी/सापळा पुर्व/सापळा कारवाईमध्ये पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन कामकाज करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी पथकात सहभाग घेणाऱ्या पोलीसांना त्यांचे दालनात बोलावुन त्यांची ओळख करुन दिली. तसेच दोन सरकारी पंच यांना बोलावुन त्यांची ओळख अनुक्रमे निखिल पुर्णानंद जमदाडे व आशिष रामभाऊ पचारे अशी ओळख करून दिली. सदर कारवाईदरम्यान ते पंचाचे काम करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर दोन्ही पंचाना पो. नि. पिंगुवाले यांनी माझा तक्रार अर्ज दाखविला, पंचांनी सदरचा अर्ज वाचून त्यांच्या सहया केल्यानंतर सदरचा अर्ज पो नि पिंगुवाले यांनी पुढील कारवाईकरिता स्वतःकडे ठेवुन घेतला. त्यानंतर पंच व मला व स्वतः गोपनीय कक्षात घेवुन गेले व तेथे माझे तसेच पो नि पिंगुवाले व दोन पंच यांचे व्यक्तव्य एका व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले.

त्यानंतर पो.नि. पिंगुवाले, स.पो.आ. अडसुरे, दोन सरकारी पंच तसेच सापळा कारवाईत सहभाग घेणारे पोलीस अंमलदार असे पथक असे लाप्रवि कार्यालयाचे आवारात उभ्या असलेल्या दोन सरकारी वाहनाजवळ आले व एका वाहनात मी व पो.नि. पिंगुवाले, स.पो.आ. अडसुरे, सरकारी पंच जमदाडे, पचारे, पो.ह. घोलप, पो.शि.यादव, व दुसऱ्या वाहनात इतर

Scanned with OKEN Scanner

पोलीस पथकातील अंमलदार असे बसुन आरे कॉलनीमधील १६ नंबर हॉस्पीटल जवळ थोडया अंतरावर थांबविल्या. त्यानंतर पो नि पिंगुवाले यांनी पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यान शर्टाच्या आतील बाजुच्या खिशामध्ये डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सागितले. त्यावेळी पो.नि. पिंगुवाले यांनी पडताळणीदरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती समजावुन सांगितली.

त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी मला शासकीय वाहनात बसवुन पडताळणी कारवाई बाबत मला व पंच यांना सुचना दिल्या व त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पो.नि. पिंगुवाले यांनी माझ्या शर्टाच्या आतील खिशामध्ये ठेवला. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांचे सुचनेप्रमाणे मी व पंच जमदाडे असे पायी चालत आरे दुगधशाळा, गोरगांव येथील राजपुत साहेब यांचे कार्यालयात गेलो व त्यांना भेटलो असता त्यांनी मला बाहेर थांबावयास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच जमदाडे त्यांचे केबीनच्या बाहेर थांबलो, थोडयावेळोने मी पुन्हा त्यांना भेटलो असता त्यांनी मला गुरांचा बाजार येथील कार्यालयात थांबावयास सांगितले त्याप्रमाणे मी व पंच जमदाडे असे जावुन तेथे थांबलो असता थोडयावेळात राजपुत साहेब तेथे आले त्यावेळी त्यांनी पंच जमदाडे यांना केबीनच्या बाहेर थांबण्यास सांगितले, त्यानंतर माझे व राजपुत साहेबांचे त्यांच्या केबीनमध्ये माझ्या कामासबंधात बोलणे झाले, त्यांवेळी सगळ काम केल तुमच...असे राजपुत साहेब मला बोलले व वरळी कार्यालयात उदया सकाळी ११.०० वाजता ये असे सांगितले. त्यानंतर मी व पंच जमदाडे तेथुन निघुन सापळा कारवाई पथक वाहन थांबले होते तेथे ॲटो रिक्षाने निघुन आलो.

त्यानंतर माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर पो.नि. पिंगुवाले यांनी काढला व स्वत:च्या ताब्यात घेवुन तो बंद केला. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी मला काय झाले असे विचारले असता, माझे व राजपुत साहेब यांचेमध्ये झालेले संभाषणाची हकीगत सांगितली. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन पंचांना ऐकवला असता त्यामध्ये माझे व लोकसेवक राजपुत साहेब यांचेमध्ये झालेल्या संभाषण ऐकविले त्यानंतर पो.नि. पिंगुवाले व स. पो.आ. अडसुरे यांनी सापळा पथकास सांगितले कि, राजपुत यांनी उदया दि. २०/०४/२०२३ रोजी स. ११.००वा. आरे दुग्धशाळा, वरळी ऑफिसला येथे येण्यास सांगितले आहे. त्यामुळे आजची कारवाई स्थगीत करीत असुन उदया सकाळी सर्वांनी वेळवेर ला.प्र.वि. कार्यालयात हजर रहावे असे सांगितले.

पो.नि. पिगुवाले यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आज दि. २०/०४/२०२३ रोजी मी ला. प्र.वि. वरळी कार्यालयात सकाळी १०.३० वा. कार्यालयात आलो त्यांनतर पंच व मला व स्वत: गोपनीय कक्षात ११.०० वा. घेवुन गेले व तेथे माझे तसेच पो नि पिंगुवाले व दोन पंच यांचे व्यक्तव्य एका व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर पो.नि. पिंगुवाले, स.पो.आ. अडसुरे, दोन सरकारी पंच तसेच सापळा कारवाईत सहभाग घेणारे पोलीस अंमलदार असे पथक असे लाप्रवि कार्यालयाचे आवारात उभ्या असलेल्या दोन सरकारी वाहनाजवळ आलो व एका वाहनात मी व पो.नि. पिंगुवाले, स.पो.आ. अडसुरे, सरकारी पंच जमदाडे, पचारे, पो.ह. घोलप, पो शि यादव, व दुसऱ्या वाहनात इतर

समक्ष,

( गणेश पिंगुवाले ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

20/04/23
( श्रीनिवास सायन्ना जुटला )

Scanned with OKEN Scanner

पोलीस पथकातील अंमलदार असे बसुन वरळी दुग्धालय, वरळी, मुंबई च्या अलीकडे सिध्दार्थ बिल्डींग समोर रोडच्या कडेला थोडया अंतरावर वाहने थांबविल्या. त्यानंतर पो नि पिंगुवाले यांनी पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यान शर्टाच्या आतील बाजुच्या खिशामध्ये डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सागितले. त्यावेळी पो.नि. पिंगुवाले यांनी पडताळणीदरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती समजावुन सांगितली.

त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी मला शासकीय वाहनात बसवुन पडताळणी कारवाई बाबत मला व पंच यांना सुचना दिल्या व त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पो.नि. पिंगुवाले यांनी माझ्या शर्टाच्या आतील खिशामध्ये ठेवला. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांचे सुचनेप्रमाणे मी व पंच जमदाडे असे पायी चालत वरळी दुगधशाळा येथील राजपुत साहेब यांचे कार्यालयात केबीनमध्ये गेलो तेव्हा त्यांनी पंच जमदाडे यांची विचारपुस करुन त्यांना केबीन बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर माझे व राजपुत साहेब यांचे माझे कामकाजाबाबत चर्चा झाली व चर्चे दरम्याने राजपुत साहेब मला म्हणाले की, " सुरुवातीस तुम्ही विस हजार देण्याचे कबुल केले होते, विस वरुन दहा, दहा वरुन आता पाचच आणले असे सांगता, पाचच्या वर काय वाढवायचे तेवढे वाढवा", त्यानंतर त्यांना मी सांगितले की, किती वाढवायचे ते सांगा साहेब मला पण समाधान वाटले पाहीले, त्यावर ते बालेले की, **"सात दया, आठ दया... काय दयायचे ते दया"** त्यांवर मी त्यांना ठिक आहे मी घरी जावुन घेवून येतो तुम्ही मला अर्धातास वेळ द्या अशी विनंती केली असता राजपुत साहेब यांनी ठिक आहे असे सांगितले, त्यानंतर मी व पंच जमदाडे असे पायी चालत सापळा कारवाई पथक वाहन थांबले होते तेथे निघुन आलो.

त्यानंतर मी पो.नि. पिंगुवाले यांनी मला, पोलीस पथक व दोन पंचाना सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर मी माझ्या बचतीतून आणलेली लाचेची रक्कम रु. ७,०००/– ( भारतीय चलनाच्या रु. ५००/– दराच्या एकुण १४ नोटा) पो.नि. पिंगुवाले यांचेकडे सुपुर्द केली. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी मला व दोन पंचांना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म सागितले व त्यांचे सुचनेनुसार पथकातील वाहन चालक श्री. जामसांडेकर यांनी नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावली. व ती रक्कम जामसांडेकर यांनी अलगद माझे शर्टाच्या बाहेरील वरच्या खिशात ठेवली. तसेच श्री जामसांडेकर हे सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तो व्हॉईस रेकॉर्डर पो.नि. पिंगुवाले यांनी माझे शर्टाच्या आतील बाजुस असणा–या डाव्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांचे सुचनेनुसार मी व पंच जमदाडे असे पायी चालत वरळी दुग्धशाळा येथे गेलो अमचे पाठोपाठ पथकातील अधिकारी व अंमलदार असे कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने आमचे पासुन काही अंतर ठेवुन वरळी दुग्धशाळा येथे येवून थांबले.

त्यानंतर मी व पंच असे राजपुत साहेब यांचे केबीनच्या दिशेने वर जात असताना राजपुत साहेब हे त्यांचे केबीनच्या बाहेर थांबले होते, त्यावेळी त्यांनी आम्हाला पाहुन मला इशारा करुन पंच जमदाडे यास खाली थांबण्यास सांगितले, त्याप्रमाणे मी पंच यांना खालीच थांबण्यास सांगुन मी राजपुत साहेब यांच्याकडे गेलो व त्यांनी मागितलेली रक्कम रु.

समक्ष,

20/04/23

( गणेश पिंगुवाले ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

( श्रीनिवास सायन्ना जुटला )

Scanned with OKEN Scanner

७,०००/— घेवून आलो असल्याबाबत सांगुन मी माझे शर्टाच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम माझ्या उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर देण्याकरीता केली असता त्यांनी माझे समोर डावा हात पुढे करुन डाव्या हाताने स्विकारली. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे खोकुन सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला सापळा पथकातील अधिकारी व अंमलदारांनी तात्काळ राजपुत साहेब यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले.

राजपुत साहेब यांनी माझ्या सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या लाभ रक्कमेसाठी महालेखा कार्यालय येथे पाठविण्यात येणा—या कागदपत्रांवर सही केल्याचा मोबादला म्हणुन मला रु. १०,०००/— ची मागणी करुन तडजोडीअंती रु. ७,०००/— लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारली म्हणुन माझी राजपुत साहेब याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

राजपुत साहेब यांचेशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचुन पाहिली असता, माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

Sd/- Sd/- 20/04/23

( गणेश पिंगुवाले ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

( श्रीनिवास सायन्ना जुटला )

Scanned with OKEN Scanner

5825 8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (अ) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील ता.वे. व ठि. 'फि' हे आरे डेअरी गोरेगांव येथे (गुरांचा बाजार) सुरक्षा विभागात पहारेकरी या पदावरुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असुन, यातील 'फि' यांना मिळणाऱ्या सेवानिवृत्ती नंतरच्या लाभांच्या रकमेसाठी महालेखा कार्यालयात पाठविण्यात येणाऱ्या कागदपत्रांच्या प्रक्रियेकरीता कागदपत्रे सही करण्याच्या मोबदल्यात यातील आलोसे यांनी 'फि' यांचेकडे रु.१०.०००/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 'फि' यांचेकडुन रु.७.०००/- लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................ Rank................ No. .............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ................................................ (3) Transferred to P.S ................................................
District .......................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] 20/04/23

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

[signature]
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...गणेश पिंगळे...
पदनाम Rank ...पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting
Code No. of I. O. ............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner